महापालिका आयुक्त कार्यालय
पुणे महानगरपालिका
जावक क्र.मआ/माप्रवि/आस्था/२०८८
दिनांक :-०१.०७.२०२०

## -: आदेश :-

विषय :- आरोग्य विभागातील सहाय्यक आरोग्य अधिकारी यांचा कार्यभार व कामकाजाचे सुधारित वाटप.

संदर्भ :- १.कार्यालयीन आदेश जा.क्र. अतिमआ(ज)/उआ(माप्र)/आस्था/५२१८, दि.२१/१२/२०१६.
२. आज्ञापत्रक जा.क्र. मआ/साप्रवि/आस्था/६/१/४९५, दि. १६/०४/२०१८.
३. कार्यालयीन आदेश जा. क्र. मआ/साप्रवि/आस्था/११२३, दि. २०/०३/२०१९.
४. कार्यालयीन आदेश जा. क्र. मआ/साप्र/आस्था/६३६१, दि. ०५/१०/२०१८.
५. कार्यालयीन आदेश जा. क्र. मआ/साप्रवि/आस्था/७३१५, दि. ०३/११/२०१८.
६. कार्यालयीन आदेश जा. क्र. मआ/साप्रवि/आस्था/५५११, दि. १५/१०/२०१९.
७. साथरोग अधिनियम १८९७ व त्या खालील सुधारणा

पुणे महानगरपालिकेकडील घनकचरा व्यवस्थापन विभाग व आरोग्य विभागाकडे पुणे शहरातील आरोग्य व्यवस्थेबाबत विविध कामे चालतात. आरोग्य विभाग हा महत्वाचा विभाग असून पुणे शहरातील नागरिकांना विविध वैद्यकीय सेवा व इतर आरोग्य विषयक सेवा पुरविण्याचे काम या विभागाकडून केले जाते. सदरची कामे अधिक कार्यक्षमतेने व तत्परतेने होणे आवश्यक असल्याने संदर्भ क्र. १ ते ६ अन्वये कार्यालयीन आदेश/आज्ञापत्र यापूर्वी प्रस्तुत करण्यात आले आहेत.

पुणे महानगरपालिकेचा वाढता विस्तार पाहता व कोरोनाच्या संसर्गजन्य आजाराशी सामना करताना कामाचे वाटप अधिक समन्यायी पद्धतीने करण्यासाठी व जबाबदारी समान पद्धतीने वाटून देण्याच्या दृष्टीने व आरोग्य विषयक कामे अधिक कार्यक्षमतेने व तत्परतेने होण्यासाठी आरोग्य विभागाकडील सहाय्यक आरोग्य

अधिकारी व पशु वैद्यकीय अधिकारी यांच्याकडील या संदर्भातील यापूर्वीचे आदेश रद्द करून पुढीलप्रमाणे कामकाजाचे सुधारित वाटप करण्यात येत आहेत.

| अ.क्र. | अधिकाऱ्याचे नाव | सुधारित कार्यभार | नियंत्रण अधिकारी |
|---|---|---|---|
| १ | डॉ. वैशाली जाधव, सहाय्यक आरोग्य अधिकारी | १. आरोग्य विभागातील सामान्य प्रशासन व आरोग्य विषयक नाविन्यपूर्ण प्रकल्प<br>२. शालेय आरोग्य<br>३. शहर क्षयरोग अधिकारी पदाची जबाबदारी<br>४. एन.यु.एच.एम., आर.सी.एच. प्रकल्प<br>५. राष्ट्रीय लसीकरण<br>६. राष्ट्रीय कार्यक्रम (क्षय, एड्स, कुष्ठरोग, अंधत्व निवारण, कुटुंब कल्याण)<br>७. क्षेत्रिय वैद्यकीय क्र. ४ वर सनियंत्रण व पर्यवेक्षण अधिकारी | डॉ. रामचंद्र हंकारे आरोग्य अधिकारी |
| २ | डॉ. अंजली साबणे, सहाय्यक आरोग्य अधिकारी | १. मा. महापौर योजना<br>२. अंशदायी वैद्यकीय सहाय्य योजना<br>३. शहरी गरीब योजना<br>४. क्षेत्रिय स्तरावरील आस्थापना<br>५.सामाजिक दायित्व योजना(CSR)<br>६. जिल्हा नियोजन समितीमार्फत करावयाची कामे<br>७. क्षेत्रिय वैद्यकीय क्र. ५ वर सनियंत्रण व पर्यवेक्षण अधिकारी | डॉ. रामचंद्र हंकारे आरोग्य अधिकारी |

| अ.क्र. | अधिकाऱ्याचे नाव | सुधारित कार्यभार | नियंत्रण अधिकारी |
|---|---|---|---|
| ३ | डॉ. मनिषा नाईक,<br>सहाय्यक आरोग्य अधिकारी | १. नर्सिंग होम रजिस्ट्रेशन<br>२. खाजगी दवाखान्याचे नियमन व नियंत्रण<br>३. विकेंद्रित परवाना विभाग.<br>४. जैव वैद्यकीय कचरा विल्हेवाट<br>५ क्षेत्रिय वैद्यकीय क्र. २ वर सनियंत्रण व पर्यवेक्षण अधिकारी | डॉ. रामचंद्र हंकारे<br>आरोग्य अधिकारी |
| ४ | डॉ. कल्पना बळीवंत,<br>सहाय्यक आरोग्य अधिकारी | १. पी.सी.पी.एन.डी.टी.,<br>२. एम.टी.पी.<br>३. बोगस डॉक्टर शोध मोहीम.<br>४. जन्म मृत्यू नोंदणी विभाग.<br>५. स्मशानभूमी व दफनभूमी अद्यावतीकरण<br>६. क्षेत्रिय वैद्यकीय क्र. ३. वर सनियंत्रण व पर्यवेक्षण अधिकारी | डॉ. रामचंद्र हंकारे<br>आरोग्य अधिकारी |
| ५ | डॉ. संजीव वावरे,<br>सहाय्यक आरोग्य अधिकारी | १. किटक प्रतिबंधक विभाग व साथरोग नियंत्रण<br>२. औषध भांडार<br>३. मनपा रुग्णालयाचे सुधारणा व आधुनिकीकरण<br>४. मेडिकल कॉलेजची उभारणी<br>५. क्षेत्रिय वैद्यकीय क्र. १ वर सनियंत्रण व पर्यवेक्षण अधिकारी | डॉ. रामचंद्र हंकारे<br>आरोग्य अधिकारी |
| ६ | डॉ. प्रकाश वाघ,<br>मुख्य पशुवैद्यकीय अधिकारी | १)पशु वैद्यकीय विभाग (कुत्रा बंदोबस्त, खाटिक विभाग इ.)<br>२)पशुंच्या संदर्भातील साथरोग . | डॉ. रामचंद्र हंकारे<br>आरोग्य अधिकारी |

नोडल अधिकारी - क्षयरोग नियंत्रण व एड्स नियंत्रण या विभागाचे काम डॉ. वैशाली जाधव, सहाय्यक आरोग्य अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली होईल.

सर्व सहाय्यक आरोग्य अधिकारी व इतर संबंधित अधिकारी यांच्याकडील सर्व कामकाज, निवेदने, पत्रव्यवहार, नस्ती व शासकीय धोरणात्मक निर्णय या सर्वांवर वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांचे सनियंत्रण व पर्यवेक्षण राहील.

हा आदेश दिनांक ०२.०७.२०२० पासून अमलात येईल.

दिनांक :- ०१.०७.२०२०

(शेखर गायकवाड)
**महापालिका आयुक्त**
पुणे महानगरपालिका

प्रत :-

१) अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज)/(वि),
२) वैद्यकीय आरोग्य अधिकारी
३) सह महापालिका आयुक्त, घनकचरा व्यवस्थापन विभाग
४) खातेप्रमुख (सर्व), पुणे मनपा